२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०२.७.२०२५	आस्थापनावरील कर्मचारी अधिकारी यांनी रुजु होताना सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्राची संचिका , सेवापुस्तिका इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाची वैयक्तीक स्वरुपाची माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहिती देय होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीच्यावेळी झालेला युक्तीवाद व आयोगासमोर असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भातील वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामूळे अशी माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१) (ज) व शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७.१०.२०१४ विचारात घेता, माहिती देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5670 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १०	द्वितीय अपील क्रं. ६०५९/२०२५

	श्री. संजय सूर्यकांत म्हस्के रा. कोतवालपुरा खडकेश्वर छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता जि. प. बांधकाम उपविभाग, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०५.८.२०२५	पाटेगाव/दादेगाव ता.पैठण येथुन मुंगी रस्ता भुसंपादन श्रीमती पार्वताबाई गंगाधर रावस यांचे बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज अन्य कार्यालयाकडे हस्तांतरीत केलेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दिनांक १५.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उप- विभागीय अधिकारी लाभक्षेत्र मार्ग उपविभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाकडे हस्तांतरीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये हस्तांतरीत केलेला आहे. माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास अशा माहिती करिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त ५ दिवसाच्या

आत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. मात्र याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विहीत मुदतीनंतर संबधित कार्यालयाकडे चुकीच्या पध्दतीने हस्तांतरीत केलेला आहे.

याप्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली वस्तुस्थितीदर्शक माहिती प्राप्त झालेली नाही. अशी माहिती अपिलार्थीस सत्वर प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (८) (क) (दोन) नुसार अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना याप्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बांधकाम जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती संबंधित कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) नुसार संकलित करुन अपिलार्थीस कलम ७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता जि. प. बांधकाम उपविभाग, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच दिनांक १०.६.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन आयोगासमोर व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5561 दि. 19/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ११	द्वितीय अपील क्रं. ५१३६/२०२५

	श्री. अंबादास उध्दव कानडे रा. मु. पो. चांगतपुरी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना पैठण प्रकल्प-२ ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१५.४.२०२५	कार्यालयीन अभिलेखानुसार अभिलेख नमुन्याची माहिती देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०.७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना पैठण प्रकल्प-२ जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे.(वैयक्तीक माहिती वगळुन) अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना पैठण प्रकल्प-२ जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दिनांक १०.६.२०२६ रोजी** द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन **आयोगासमोर व्यक्तीश:** उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सेहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5562 दि. 19/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १२	द्वितीय अपील क्रं. ५२०८/२०२५

	श्री. गजानन पाटील (काळे) द्वारा एल सेक्टर ८२/१ शिवाजीनगर हडको एन-९, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना पैठण प्रकल्प-१ ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१०.१.२०२५	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २५.३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5671 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १३ व १६	द्वितीय अपील क्रं. ५२०९ व ५३१२/२०२५

	श्री. गजानन पाटील (काळे), द्वारा एल सेक्टर ८२/१ शिवाजीनगर हडको एन-९, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प-१ व २ छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १४.११.२०२५,२१.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२३.१२.२०२४	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती
१०.१.२०२५	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २९.७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प- १ व २ छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी

यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना प्रकल्प-१ व २ छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दिनांक १०.६.२०२६ रोजी** द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन **आयोगासमोर व्यक्तीश:** उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5563 दि. 19/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १४ व १५	द्वितीय अपील क्रं. ५२१० व ५२११/२०२५

	श्री. गजानन पाटील (काळे) द्वारा एल सेक्टर ८२/१ शिवाजीनगर हडको एन-९, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कन्नड प्रकल्प-१ व २ ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१०.१.२०२५	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती
१०.१.२०२५	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २९.७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कन्नड प्रकल्प-१ व २ ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३०

दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कन्नड प्रकल्प- १ व २ ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच दिनांक १०.६.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन **आयोगासमोर व्यक्तीश:** उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5558 दि. 19/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १७	द्वितीय अपील क्रं. ५३१३/२०२५

	श्री. गजानन पाटील (काळे) द्वारा एल सेक्टर ८२/१ शिवाजीनगर हडको एन-९, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २१.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितानां त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१०.१.२०२५	कार्यालयीन वाहन वापर व वाहन बिल परतावा अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5672 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १८	द्वितीय अपील क्रं. ८७९/२०२५

	श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, रा. हीना मंजील नुर कॉलनी टाऊन हॉल, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (सामान्य प्रशासन) संकलन (प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २८.२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२९.८.२०२४	जिल्हाधिकारी कार्यालय परिसर मधील नोंदणी कार्यालय आवारातील एकुण १० दुकानाची पुर्ण माहिती मिळणे बाबत.

आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(सामान्य प्रशासन)संकलन (प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना

त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (सामान्य प्रशासन) संकलन (प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच दिनांक १०.६.२०२६ रोजी द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन आयोगासमोर व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर विहीत मुदतीत अपेक्षित कार्यवाही केलेली नसल्याने अधिनियमातील कलम १९(६) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६,दि.३१.०३.२००८ नुसार कार्यवाही अनुसरावी.

४. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

५. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5559 दि. 19/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. १९	द्वितीय अपील क्रं. ६१०/२०२६

	श्री. सुनील प्रेमराज गायकवाड रा. नारळीबाग छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपनिबंधक सहकारी संस्था, तालूका छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, तालूका छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.२.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०१.१०.२०२५	अष्टगंध सहकारी गृहनिर्माण संस्थेचे उपविधी

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दि. १२.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. उपलब्ध करुन दिलेल्या माहिती शिवाय इतर माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5681 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २०	द्वितीय अपील क्रं. ३३२/२०२५

	श्री. रघुनाथ शेनफडु मोरे रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत घाटनांद्रा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२१.८.२०२४	गट नं. १ मधील प्लॉट नं. १२१५ याचा बॉण्डनुसार आधारे फेर होण्यास कायदयाची अडचण काय ते सांगावे. इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, यांनी त्रयस्थपक्षाची माहिती मागविली असुन मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात आहे.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये माहितीची व्याख्या दिलेली आहे. या व्याख्येनुसार माहिती तयार करुन, माहितीचे संस्करण करुन, इतर कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन, लेखी, खुलासे, स्पष्टीकरण मागणारी इत्यादी माहिती देणे अभिप्रेत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5682 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २१	द्वितीय अपील क्रं. ६५३/२०२५

	श्री. शेख युसूफ शेख गुलाम अहेमद कुरेशी, मु. डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १०.२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०८.११.२०२३	२०२१ ते २०२३ मध्ये ग्रामनिधी, पाणीपुरवठा व १५ वा वित्त आयोगाचे किती काम झाले इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याअनुषंगाने दि. ९.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना संकेतस्थळाचे अवलोकन करणे विषयी कळविले असता अपिलार्थी यांनी सदर पत्र घेण्यास नकार दिलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक अस्लेली माहिती संदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी पत्रान्वये कळविली असता अपिलार्थी यांनी पत्र घेण्यास नकार दिलेला आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5683 दि. 21/05/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २२ व २३	द्वितीय अपील क्रं. ८१५ व ८१६/२०२५

	श्री. गणेश हिम्मतराव सिरसाठ रा. पिंप्री पो. वरुड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत पिंप्री वरुड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २१.२.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये २ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०६.९.२०२४ ३०.८.२०२४	मौ. पिंप्री वरुड जन्म मृत्यु नोंदीची माहिती. हॉटेल अश्विनी बांधकाम परवानगी, इत्यादी

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती दिनांक ०४.२.२०२५ व दिनांक ११.११.२०२४ रोजी समक्ष उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5673 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २४	द्वितीय अपील क्रं. १६६६/२०२५

	श्री. मयुर राजेंद्र मोहारे, रा. स्वातंत्र सैनिक कॉलनी पांडुरंग नगर, ता. येवला जि. नाशीक	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २८.४.२०२५रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०२.१२.२०२४	कोकीळाबाई हेमचंद्र नखरे या केव्हापासुन अंगणवाडी मदतनीस पदावर कार्यरत आहेत इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मोघमपणे त्रयस्थपक्षाची वैयक्तीक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./S 674 दि. 21/S/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २५	द्वितीय अपील क्रं. २२०२/२०२५

	श्री. जाकीर नकीम तडवी रा. जळकी बाजार पो. शिवना ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, जळकी बाजार ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२५.२.२०२५	ग्राम पंचायतीची सविस्तर माहिती मिळणे बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १२.३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत, जळकी बाजार ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5675 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २६	द्वितीय अपील क्रं. २११४/२०२५

	श्री. सय्यद सुलतान सय्यद इसा, रा. गल्ली नं. ५ शिक्षक कॉलनी अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २७.५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२७.२.२०२५	उप मुकाअ पं. जि. प यांचे पत्र दि. २०.५.२०२४ वर केलेल्या कार्यवाहीची माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दि.१७.४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळालेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पुनश्च उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5685 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २७	द्वितीय अपील क्रं. २१४५/२०२५

	श्री. सय्यद सुलतान सय्यद इसा, रा. गल्ली नं. ५ शिक्षक कॉलनी अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, अंजिठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २९.५.२०५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२७.२.२०२५	दि.२७.२.२०२५ रोजीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागविलेली आहे. आजरोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, अपिलार्थी हे वारंवार विविध प्राधिकरणाकडे तक्रार अर्ज दाखल करतात व सदर तक्रारीवर काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती, माहिती अधिकाराअंतर्गत मागवतात. तक्रार अर्जावरील सद्यस्थिती ज्ञात करुन घेण्याकरिता माहिती अधिकाराचा वापर करणे आयोगास उचित वाटत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) नुसार कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5679 दि.21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २८	द्वितीय अपील क्रं. ३६०४/२०२५

	श्री. धम्मपाल साहेबराव सुरडकर रा. शिवाजी महाराज पुतळया जवळ, मुंकदवाडी, छत्रपती संभाजीगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत मादणी/ वडाळी ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२५.३.२०२५	मादणी/वडाळी ग्राम पंचायतचे ऑडीट रिपोर्ट सन २०१५ ते २०२४

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त झाली असल्याबाबत दिनांक ८.४.२०२६ रोजी लेखी निवेदन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ ५६८० दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. २९ व ३०	द्वितीय अपील क्रं. ३९८८ व ३९८९/२०२५

	श्री. रहिमखा हिरेखा पठाण रा. मु. पो. उंडणगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत,उंडणगांव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २८.८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०३.१.२०२५	सर्व सामान्य पावतीची सत्यप्रत मिळणे बाबत.
०३.१.२०२५	नमुना नं. ८ ची सत्यप्रत

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5676 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ३१	द्वितीय अपील क्रं. ४५१५/२०२५

	श्री. ई. टी. काळे रा. खुपटा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय खुपटा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
७.७.२०२५	१४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या मिळालेल्या रक्कमा व त्याचा कोणत्या कामासाठी खर्च झाला आहे. इत्यादी

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5677 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ३२	द्वितीय अपील क्रं. ४८८४/२०२५

	श्री. शेख सपडु शेख गुलाम अहेमद कुरेशी रा. डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०१.७.२०२५	सन २०२१ ते २०२५ पर्यंत १५ वा वित्त आयोगाचे किती कामे झाले इत्यादी

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ऑनलाईन उपलब्ध असल्याने अपिलार्थी यांना दिनांक ०९.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ऑनलाईन माहिती उपलब्ध करुन घेणे विषयी सुचित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ०८.९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5678 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ३३ ते ३८	द्वितीय अपील क्रं. ५२२२ ते ५२२६, ५२३०/२०२५

	श्री. जमील जहीरमिया देशमुख रा. डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १७.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०६ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१०.६.२०२५	१. अनुसुचित जाती व वस्तीमध्ये कामाचे माहिती मिळणे बाबत.
१०.६.२०२५	२. १५ व्या वित्त आयोगाच्या संदर्भात माहिती मिळणे बाबत.
१०.६.२०२५	३. ग्रा. पं. अंतर्गत पोलवर बसवलेले लाईट विषयी माहिती
१०.६.२०२५	४. ग्रा. पं. च्या खात्यात कराची किती रक्कम जमा झाली याची माहिती
१०.६.२०२५	५. जनसुविधा योजनेतील रक्कमेतुन इलेक्ट्रीक पोल लाईटची माहिती
१०.६.२०२५	६. रोजगार हमी योजना व्यक्तीगत विहीर व सिंचन विहीर संदर्भात माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ऑनलाईन उपलब्ध असल्याने अपिलार्थी यांना दिनांक ०९.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये ऑनलाईन माहिती उपलब्ध करुन घेणे विषयी सुचित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २५.८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय डोंगरगाव ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०६ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5684 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ३९ ते ४२	द्वितीय अपील क्रं. ५४८७ ते ५४८९, ५४९१/२०२५

	श्री. आर. एम. शेख रा. एन-०७ सी-६७, पोलीस कॉलनी सिडका, छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०४ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२३.६.२०२५	१. आपल्या कार्यालयातील पाणी टंचाई विभागाअंतर्गत माहिती मिळणे
११.८.२०२५	२. टँकर व विहीर अधिग्रहण खर्च टँकरनिहाय व गावनिहाय
११.८.२०२५	३. विहीर अधिग्रहण केलेल्या विहीर मालकाचे नाव, गट क्रं. इ.
२३.६.२०२५	४. टँकरच्या जीपीएस प्रणालीची माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असुन अपिलार्थी यांनी दि. १७.४.२०२६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळाली असल्याबाबत पोच दिलेली असल्याने विचाराधीन अपिले निकाली काढण्यात यावेत ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०४ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5686 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ४३ ते ४७	द्वितीय अपील क्रं. ५८९९, ५९००, ३३०४, ४९२२, ४९२४/२०२५

	श्री. राधेश्याम प्रकाश झलवार रा. अंजिठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत अंजिठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत पंचायत समिती, सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१२.२०२५,२१.७.२०२५, ३१.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०६.८.२०२५	१. अंजिठा ग्राम पंचायतमध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत अंजिठा पाणी पुरवठावर बसविलेले सोलास संच माहिती
६.८.२०२५	२. अंजिठा ग्राम पंचायतमध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत कोणकोणते काम मंजुर झाले
०२.४.२०२५	३. सन २०२२ ते २०२५ पर्यत झालेल्या सर्व मासिक मिटींगचे सर्व ठराव
३०.७.२०२५	४. वक्फ संस्था मोगल शहा वली नोंदणी क्रं. Msbw/abd/ २१६/२०१० या ठिकाणी सुरु असलेले शादीखाना च्या कामाच्या माहिती बाबत.
०४.८.२०२५	५. डोंगरी भागातुन झालेल्या गायमुख स्मशानभुमीच्या कार्याच्या माहिती बाबत

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली अपील क्रं. ५८९९ व ३३०४/२०२५ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र अपील क्रं. ५९००,४९२२ व ४९२४/२०२५ संदर्भातील माहिती अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली उर्वरित माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०५ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5687 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ४८	द्वितीय अपील क्रं. १२२६/२०२५

	श्री. पुंडलिक उमाकांत सोमवंशी रा. बोळेगांव खु. ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत बोळेगाव खु. ता. चाकुर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २४.३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१४.१२.२०२४	ग्राम पंचायत कार्यालयाची सन २०२० ते २०२४ पर्यतची संपुर्ण माहिती मिळणे बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तीवादावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला आहे. यावरुन अपिलार्थी यांना माहिती मध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5688 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ४९	द्वितीय अपील क्रं. १६८१/२०२५

	श्री. रणजित शिवाजीराव पाटील रा. जानवळ ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत जानवळ खु. ता. चाकुर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २३.४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१५.१.२०२५	दि. ४.१.२०२२ पासून एकूण झालेल्या मासिकसभा, सुचना रजिस्टर, उपस्थिती रजिस्टर

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २४.३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी आदेशित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत जानवळ खु. ता. चाकुर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत,पंचायत समिती,चाकुर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र रा इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5089 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५० व ५१	द्वितीय अपील क्रं. २७५८ व २७६०/२०२५

	श्री. यादव मलाप्पा करडीले रा. जानवळ ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत जानवळ खु. ता. चाकुर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१५.१.२०२५ १५.१.२०२५	१. दि. ४.१.२०२२ पासून एकूण झालेल्या मासिकसभा, सुचना रजिस्टर, उपस्थिती रजिस्टर २. नमुना नं. १ ते ३३ चे दि. ४.१.२०२२ पासुन आजपर्यंतची सत्यप्रती

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २४.३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी आदेशित केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत जानवळ खु. ता. चाकुर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत,पंचायत समिती,चाकुर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5690 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५२	द्वितीय अपील क्रं. ३९२९/२०२५

	श्री. सुरज बळीराम साके, रा. मु. पो. शिवणखेडा बु ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत शिवणखेड बु ता. चाकूर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २१.८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०३.६.२०२५	शासनाच्या माध्यमातुन ग्रा. पं. कार्यालय शिवणखेड बु येथे आलेल्या निधीची सविस्तर माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २२.९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती समक्ष उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5691 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५३, ५५ व ५६	द्वितीय अपील क्रं. ४४११, ५२६६ व ५२६७/२०२५

	श्री. खंडु मनोहर मारकड, रा. मष्णेरवाडी पो. अंजनसोडा बु. ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत मष्णेरवाडी ता. चाकूर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २४.९.२०२५ व १८.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०८.४.२०२५ २२.७.२०२५ २२.७.२०२५	१) ग्रा. प. खाते नं. १ चे जमा खर्चाची माहिती इ. २) १५ वा वित्त आयोग माहिती एम. बी., इस्टेमेट, बिलाच्या पावत्या इ. ३) रोजगार हमी योजनेची माहिती बिले, कोणाला चेक दिले इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी हे ग्राम पंचायत मध्ये रोजगार सेवक या पदावर कार्यरत आहेत. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना घेणे विषयी विनंती केली असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला आहे. अपिलार्थी

यांना ग्राम पंचायत मधील रोजगार सेवक या पदावरुन काढण्यात आले असल्याने ते पुर्वग्रहदुषित हेतुने त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीची मागणी करतात. माहिती मागण्यामध्ये त्याचे कोणतेही व्यापक जनहित नाही.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. यावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे सन २०२२ ते २०२५ या कालावधीची विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही.अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये आयोगास कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. तसेच सदरची माहिती प्रकट केल्यामुळे नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांना सुनावणीवेळी विचारणा केली असता ते याबाबत कोणतेही समर्थनिय कारण सांगु शकले नाहीत. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०३ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5692 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५४	द्वितीय अपील क्रं. ५२६५/२०२५

	श्री. बोडके मार्तड नागनाथ रा. घरणी ता. चाकुर जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत घरणी ता. चाकूर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, चाकुर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १८.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१२.५.२०२५	ग्राम पंचायतीतील खालील ०९ मुद्याची माहिती सन २०१८ ते २०२२

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये व्यक्तीश: माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहिती दिली असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिला असल्याने अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने त्यांना त्यांची बाजु मांडण्याची वाजवी संधी देण्यात येऊनही ते सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असता त्यांनी ती स्विकारली नाही यावरुन अपिलार्थी यांना माहिती मध्ये तसेच आयोगासमोरील सुनावणीमध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

याप्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मोघमपणे विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित/संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणा कडील मनुष्यबळ/साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5693 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५७ व ५८	द्वितीय अपील क्रं. १७३६ व १७३७/२०२५

	श्री. क्षिरसागर रावसाहेब नारायण रा. माळुंब्रा पो. तुगी बु ता. औसा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत माळुंब्रा ता. औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१३.१.२०२५ १३.१.२०२५	१) ग्राम पंचायतच्या सर्व खात्याच्या बँक खातचे सर्व स्टेटमेंट २) ग्राम पंचायतला विविध प्रकारची कामे करण्यासाठी मिळालेला निधी

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असुन माझे समाधान झाले आहे असे अपिलार्थी यांनी तोंडी कळविले असल्याने विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5694 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ५९ व ६०	द्वितीय अपील क्रं. २३२७ व २३२८ /२०२५

	श्री. कोळी पांडुरंग भानुदास रा. नांदुर्गा ता. औसा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत नांदुर्गा ता. औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १२.६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१८.३.२०२५ १८.३.२०२५	१) ग्राम पंचायत अंतर्गत घरपट्टी आकारणी केली जाते सदरची आकारणी ज्या नियमानुसार केली जाते त्या नियमाची माहिती २) तंटा मुक्ती समितीची नियमानुसार अधिकार, कार्य, कर्तव्ये व जबाबदारी

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ३०.५.२०२५ रोजीच्या आदेशानुसार माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २०.६.२०२५ रोजीच्या नोंदणीकृत टपालाने अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5695 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ६१ व ६२	द्वितीय अपील क्रं. ३९३० व ४२३२/२०२५

	श्री. अमन ईश्वर सुरवसे रा. सोमवंशी नगर मेडिकल कॉलेज समोर अंबजोगाई रोड, लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत बुधोडा ता. औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २२.८.२०२५ व ५.९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२०.५.२०२५	१) केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडुन सन २०२० ते २०२५ या कालावधीत किती विकास निधी मिळाला
२०.५.२०२५	२) गेली पाच वर्षाचे ऑडीट रिर्पाट

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २२.७.२०२५ रोजीच्या आदेशानुसार माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती दिनांक २९.१.२०२६ रोजी अपिलार्थी यांना समक्ष उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5703 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ६३	द्वितीय अपील क्रं. ५५००/२०२५

	श्री. पांडुरंग बाबुराव कुलकर्णी रा. जावळी ता. औसा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत जावळी ता. औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, औसा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
२०.८.२०२५	सन २०२२ ते २०२५ या कालवधीमधील सर्व प्रकारच्या कामाची लेखी माहिती

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र जन महिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत जावळी ता. औसा जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, औसा जि. लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5704 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ६४ ते ६९	द्वितीय अपील क्रं. २६१३ ते २६१८/२०२५

	श्री. व्यंकट भगवानराव कदम रा. उषाकिरण पेट्रोल पंपाच्या पाठीमागे बार्शी रोड, लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी ग्राम पंचायत दर्जीबोरगाव, ता. रेणापूर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, रेणापूर जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २५.६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०९.४.२०२५	ग्रामनिधी बँक खात्याच्या तपशील वर्षनिहाय सन २००० ते २०२५
०९.४.२०२५	सन २०१५ ते २०२५ पर्यंत नागरिकांनी देण्यात आलेल्या नळपट्टी, घरपट्टी बिलाची प्रत
०९.४.२०२५	सन २००० ते २०२५ पर्यंतच्या लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या प्रती
०९.४.२०२५	दलीत वस्ती, तांडावस्ती सुधार योजने अंतर्गत पुर्ण झालेल्या कामाच्या प्रती
०९.४.२०२५	सन २०२३ ते २०२५ मध्ये कामावरील भरलेल्या जीएसटी व टीडीएस च्या प्रती
१२.३.२०२५	सन २०२३ ते २०२५ या कालावधीचे प्रोसोर्डींग इत्यादी

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०६ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5705 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७०	द्वितीय अपील क्रं. ४१७/२०२५

	श्रीमती निर्मला प्रेमनाथ कांबळे रा. देवी हल्लाळी ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत देवी हल्लाळी ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २७.६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्वात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०४.१०.२०२४	कंत्राटदार महारुद शिवानंद हासूरे यांनी ग्रा. पं. देवी हल्लाळी येथील कामामध्ये वापरण्यात आलेल्या सहित्याच्या गौण खणीजाच्या पावत्या

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना दिनांक १६.१२.२०२४ रोजी समक्ष उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5706 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७१	द्वितीय अपील क्रं. ४२६ /२०२५

	श्री. कांबळे रमाकांत विठ्ठल रा.शिऊर ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत शिऊर ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २७.१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१९.९.२०२४	घरकुलाचे ठराव/ ८ अ उतारा मिळणे बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना दिनांक १९.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगास अवगत केले असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5707 दि. 21 | 5 | 2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७२	द्वितीय अपील क्रं. ८४१/२०२५

	श्री. ढोरसिंग अमोल मधुकर, रा. ज्ञानेश्वर चौक औराद शहाजानी ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत बोरसुरी ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक २४.२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१८.१०.२०२४	ग्राम पंचायत कार्यालय अंतर्गत जमा खर्च बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात,अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे.आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./5696 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७३ व ७४	द्वितीय अपील क्रं. ९३० व ९३१/२०२५

	श्री. नुर बाबामियाँ पटेल रा. जाऊ पो. नंनद ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत जाऊ ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१३.९.२०२४ १८.९.२०२४	१. ग्रामसभा पोसिडींग बुक व नोटीस बुक २. एमबी मोजमाप पुस्तिका व बँक स्टेटमेंट व कोटेशन इ.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात,अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे.आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5697 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७५	द्वितीय अपील क्रं. १९६९/२०२५

	श्रीमती सुरवसे उषाताई रमेश रा. आंबेगाव म ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत आंबेगाव म. ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १५.५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१७.२.२०२५	दलित वस्तीमधील गट्टुचे कामे इस्टिमेट

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना दिनांक २५.५.२०२५ रोजी उपलब्ध करुन दिलेली असुन अपिलार्थी यांनी मिळालेल्या माहितीनुसार समाधनी असल्याचे लेखी दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5698 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७६ व ७७	द्वितीय अपील क्रं. ४६६३ व ४६६४/२०२५

	श्री. राम विठ्ठलराव शिंदे रा. माळेगाव (क) ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत माळेगाव (क) ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
१८.७.२०२५ १८.७.२०२५	१) ग्राम पंचायत कर आकारणी नोंदवही व मिळकत नोंदवही बाबत. २) प्रपत्र अ ब कड सर्वेक्षण बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत स्वरुपाची माहिती मागविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत माळेगाव (क) ता. निलंगा जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5699 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७८	द्वितीय अपील क्रं. ४७१९/२०२५

	श्री. गणेश कैलाश चिंचनसुरे रा. सदभावना नगर औसा रोड लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कासार सिरसी ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक १५.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०८.५.२०२५	उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशा बाबत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना प्रथम अपिल सुनावणीवेळी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे. तसेच दिनांक २०.४.२०२६ रोजीच्या आयोगाकडे सादर केलेल्या निवेदनामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे विषयी विनंती केली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत कासार सिरसी ता. निलंगा जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पुनश्च उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ ५७०० दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ७९	द्वितीय अपील क्रं. ६०७७/२०२५

	श्री. कांबळे रमाकांत विठ्ठल, रा.शिऊर ता. निलंगा जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत शिऊर ता. निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, निलंगा जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०४.९.२०२५	मिळकत क्रं. ३५० च्या मिळकतीचा ८ अ उतारा इत्यादी

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात,अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5701 दि. 21/5/2026

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ८१	द्वितीय अपील क्रं. ५५५९/२०२५

	श्री. जिवन बाबुराव जरिपटके रा. भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०७.७.२०२५	मौ. भिंगोली सन २०२२ ते २०२५ मधील कामाचा तपशील

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

३. गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 5702 दि. 21/5/2026

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

बोर्ड क्रं. ८०	द्वितीय अपील क्रं. ५५५८/२०२५

	श्री. राम शंकर गायकवाड रा. भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	अपिलार्थी

विरुध्द

१.	जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.१
२.	प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर	:	उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २१.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दि.	माहिती अर्जातील विषय थोडक्यात
०७.७.२०२५	महादेव मंदिर विकास कामासाठी मंजुर झालेला निधी व करण्यात आलेले कामाचे विवरण

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत अधिकारी, ग्राम पंचायत भिंगोली ता. शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दिनांक १०.६.२०२६ रोजी** द्वितीय अपील क्रं. व सुनावणी दिनांकाचा संदर्भ नमुद करुन **आयोगासमोर व्यक्तीश:** उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्व सुचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थितीत असल्याने त्यांचे विरुध्द सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कारवाई करावी.

४. गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर यांना आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्या करिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ ५५५८ दि. १५/५/२०२६

प्रतिलिपी- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ जि. लातूर